# दिव्यांग व्यक्तींच्या भविष्यासाठी 'स्वनिकेतन'

## 'परांजपे स्कीम्स'तर्फे देशातील पहिल्या निवासी प्रकल्पाची संकल्पना

**पुणे, ता. २६ :** दिव्यांग मुलांच्या पालकांसमोर त्यांच्या पश्चात मुलांचे काय, असा गंभीर प्रश्न उभा असतो. या सामाजिक वास्तवाचा विचार करून 'परांजपे स्कीम्स'ने 'स्वनिकेतन' या समावेशक निवासी प्रकल्पाची आणि त्यावर आधारित चित्रमालिकेची निर्मिती केली आहे. या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींच्या सुरक्षित भविष्यासाठी देशातील पहिल्या निवासी समुदायाची संकल्पना मांडण्यात आली आहे.

दिव्यांग मुलांची आयुष्यभर काळजी घेणाऱ्या पालकांसाठी 'स्वनिकेतन' हा प्रकल्प केवळ मालमत्ता नसून सुरक्षिततेची हमी देणारा ठरणार आहे. 'परांजपे स्पेशल प्रोजेक्ट्स अंतर्गत' विकसित या प्रकल्पात सुलभ वास्तुरचना, मानसिक आरोग्यासाठी आधार आणि समुदायाधारित साह्य उपलब्ध करून दिले आहे.



'परांजपे स्कीम्स'तर्फे निर्मित 'स्वनिकेतन' चित्रमालिकेतील एक प्रसंग

'परांजपे स्कीम्स'चे व्यवस्थापकीय संचालक शशांक परांजपे म्हणाले, ''स्वनिकेतन हा केवळ गृहनिर्माण प्रकल्प नसून तो काळजी, सन्मान आणि स्वावलंबन यावर आधारित समुदाय आहे. लोकांच्या खऱ्या गरजा ओळखून आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून हा प्रकल्प उभारला आहे.''

या प्रकल्पावर आधारित चित्रमालिकेच्या पहिल्या भागात पालकांच्या मनातील भीती आणि भविष्यातील अनिश्चिततेवर प्रकाश टाकला आहे. या मालिकेचा दुसरा भाग रोजच्या आयुष्यात न दिसणाऱ्या संघर्षांवर भाष्य करतो, तर तिसऱ्या भागात 'परांजपे स्कीम्स'चा रिअल इस्टेटपासून सामाजिक पायाभूत सुविधांकडे होणारा प्रवास अधोरेखित केला आहे.